


दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १८८ ●मंगळवार, दि.०७ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# २४७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर

## कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रवर्गाचा नगराध्यक्ष, संपूर्ण यादी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत आज नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली. राज्यातील २४७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत आज काढण्यात आली. यामध्ये ३३ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जाती, ११ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्गाचे नगराध्यक्ष ६७ नगरपालिकांमध्ये असतील. तर खुल्या प्रवर्गाचे नगराध्यक्ष १३६ नगरपालिकांमध्ये असतील. आज जाहीर झालेल्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणामुळं निवडणूक प्रक्रियेला आता वेग येणार आहे.

### • प्रवर्गनिहाय नगराध्यक्ष आरक्षणाची यादी

**अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीवः– ३३ नगरपालिका**

घुग्घुस (महिला), पांचगणी, अकलूज (महिला), ओझर (महिला), शिर्डी (महिला), डिगडोह (देवी) (महिला), तेल्हारा (महिला), शिरोळ (महिला), मोहोळ (महिला), भुसावळ (महिला), फुरसुंगी ऊरुळी-देवाची, वानाडोंगरी (महिला), हुपरी, शेगांव, लोणावळा, बुटीबोरी, आरमोरी, मलकापूर, जि. सातारा, ▶▶ उर्वरित पान २ वर




## बीडचे नगराध्यक्षपद एससी महिलेसाठी राखीव

### • बीड जिल्ह्यातील सहा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांचे आरक्षण जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सहा ही नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांचे आरक्षण आज जाहीर झाले असून, या आरक्षणामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या भावी नगराध्यक्षांचे स्वप्न भंगले आहे. बीडचे नगराध्यक्षपद एससी महिलेसाठी आरक्षित झाले आहे. याची घोषणा होताच हा चर्चेचा विषय ठरला आहे. तर गेवराई व धारुर येथील ओपन साठी सुटल्याने येथे रस्सीखेच होणार असे दिसत असून, बीडमध्ये मध्ये मात्र अनेकांचा हिरमोड झाला आहे. मागील तीन वषारपेक्षा जास्त काळापासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. कोर्टाने या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले असल्याने आणि जानेवारीच्या आत या निवडणुका घेण्याची डेड लाईन दिली आहे. यामुळे निवडणूक आयोग क्शन मोड मध्ये आले असून, यापूर्वीच जिल्हापरिषद अध्यक्ष व पंचायत समिती सभातीचे आरक्षण जाहीर झाले आहे. तर गट,गण आणि प्रभाग अरक्षणाची तारीख निश्चित केलेली आहे. तर आज सोमवारी (दि.६) मंत्रालयात राज्यातील नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## MPSC कडून १३८ जागांसाठी नवी जाहिरात, महाराष्ट्र गट-क सेवेची पूर्व परीक्षा होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. एमपीएससीकडून महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या जाहिरातीद्वारे ९३८ पदांच्या भरतीसाठी पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उद्योग निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक आणि लिपीक टंकलेखक पदाच्या भरतीसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे.

उद्योग निरीक्षक पदाच्या ९ जागा भरल्या जाणार आहेत. तांत्रिक सहायक पदाच्या ४ जागा, कर सहायक ७३ जागा आणि लिपिक टंकलेखक पदाच्या ८५२ ▶▶ उर्वरित पान २ वर

# शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळं केलं

## आमचं आरक्षण हिसकावून ओबीसींना दिलं, मनोज जरांगेंचा हल्लाबोल



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे यांनी पहिल्यांदाच थेट शरद पवारांवर गंभीर आरोप केले आहेत. १९९४ मध्ये शरद पवारांनी मराठ्यांचं १६ टक्के आरक्षण हिसकावून ओबीसींना दिल्याने मराठा समाजाचं वाटोळं झाल्याचा घणाघाती आरोप जरांगे यांनी केला. याचवेळी, ओबीसी नेत्यांनीही पवारांचे उपकार मानले नसल्याची टीकाही त्यांनी केली. मराठ्यांचं हक्काचं आरक्षण हिसकावलं– मनोज जरांगे म्हणाले, १९९४ मध्ये मराठ्यांचं हक्काचं १६ टक्के आरक्षण शरद पवारांनी ओबीसींना दिलं. यामुळे मराठा ▶▶ उर्वरित पान २ वर



**बीड नगरपालिकेतील आरक्षण दलीत महिला (SC) भगिनीसाठी आरक्षित झाले. बीड शहरातील नागरीकांसाठी ही आनंदाची वार्ता आहे. बीड शहरातील दलीत बांधव सर्व घटकांच्या बरोबर समरसतेने वागतात. सर्वांसोबत राहतात. संविधानाची किमया, या वेळी दलीत बांधवांना न्याय मिळाला. एक मात्र घडले, नगराध्यक्ष पद मक्तेदारी समजून टपुन बसलेल्यांचा भ्रमनिरास झाला. नियतीचा न्याय अजब असतो आणि तो कधी कधी गहजब करतो पण सखद असतो हा अनुभव बीडकर आता अनुभवतील. अध्यक्ष पदासाठी टपुन बसलेल्यांसाठी मी सहानुभूती व्यक्त करतो, अजून काय करू शकतो ?– माजी मंत्री. प्रा. सुरेश नवले याची प्रतिक्रिया**

# ३७ लाखांच्या हळद चोरीच्या बनावट प्रकरणाचा अवघ्या २४ तासात उलगडा

## अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांची तत्पर कारवाई ; ट्रकमालक, चालक जेरबंद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सांगलीला नेण्यासाठी पाठविलेली तब्बल ३० टन हळद लंपास करून पोलिसांना खोटी माहिती दिल्याच्या प्रकरणात अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी केवळ २४ तासांत चाणाक्षपणे तपास करत संपूर्ण बनाव उघडकीस आणला. पोलिसांनी हा सर्व बनाव रचणाऱ्या ट्रक चालक व मालक या



दोघांना अटक केली आली असून त्यांच्याकडून सुमारे ३७ लाख ८१ हजार ७०० रुपयांची ५७० पोती हळद जप्त केली आहे. दुर्वा कमोडीटी प्रा. लि. या कंपनीचे संचालक प्रितेश दुर्गाप्रसाद सोनी हे यांनी ३० सप्टेंबर रोजी राधा सर्वेश्वर कंपनी सोलापूरमार्फत ३० टन हळद खरेदी केली होती. ही हळद सांगली येथे पोहोचविण्यासाठी त्यांनी ट्रक क्रमांक एमएच २६ एडी २९३५ ▶▶ उर्वरित पान २ वर

# पुण्यातील २२००० मेडिकलमध्ये 'ती' २ जीवघेणी कफ सिरप? यंत्रणांना खडबडून जाग

**मुंबई । प्रतिनिधी**

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित खोकल्याच्या औषधामुळे म्हणजेच कफ सिरपमुळे आतापर्यंत १७ लहान मुलांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त झाल्यानंतर राज्यातील औषध प्रशासन यंत्रणा सतर्क झाली आहे. पुणे विभागात विक्री होणाऱ्या कफ सिरपची तपासणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सुरू केली असून, संबंधित




कंपनीच्या सिरपची विक्री तातडीने थांबविण्याचे आदेश औषध विक्रेत्यांना देण्यात आले आहेत. पुण्यात त्या औषधाचा साठा? दोन्ही राज्यांमध्ये आतापर्यंत १७ मुलांचा मृत्यू झाल्याची नोंद असून, या मृत्यूंमागे दूषित कफ सिरप कारणीभूत असल्याचं स्पष्ट झालं आहे. या पार्श्वभूमीवर एफडीएने पुण्यात या कंपनीचा औषधसाठा उपलब्ध आहे का, याची तपासणी ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या जेलमध्ये बायबलचे श्लोक, धर्मांतरणासाठी लाखो रुपयांची ऑफर; गोपीचंद पडळकरांचा जेलरवर आरोप

**सांगली । प्रतिनिधी**

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी बीडचे कारागृह




अधीक्षकांवर आरोप केला आहे. बीडच्या जेलमध्ये धर्मांतराचे काम होते, सगळ्या महापुरुषांचे फोटो काढून त्या ठिकाणी बायबलमधील श्लोक लिहिल्याचा आरोप पडळकरांनी केला. जेलमधील कीर्तन बंद करण्यात आलं. तर कैद्यांना धर्मांतरासाठी लाखो रुपयांचे आमिष दाखवले जात असल्याचा आरोप पडळकरांनी केला. आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि या प्रकरणाची तपासणी करण्याची मागणी केली.

गोपीचंद पडळकर म्हणाले की, बीडचे जे तुरुंग अधिकारी आहेत तिकडे ते धर्मांतराचं काम करत आहेत. तिकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि गणपतीची मूर्ती होती, ती काढून टाकलेली आहे. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो, महात्मा गांधींचा फोटो काढून टाकलेला आहे. ते सर्व फोटो एका खोलीत टाकलेले आहेत. जेलमध्ये सगळे बायबल मधले श्लोक लिहिले आहेत. कैदी जेलमध्ये भजन कीर्तन करायचे, ते भजन ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'लाडक्या बहिणी'मुळे 'आनंदाचा शिधा' बंद!

## फडणवीसांचा कॅबिनेट मंत्री म्हणाला, '४५ हजार कोटी...'




**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारने तीन वर्षांपूर्वी सुरू केलेली 'आनंदाचा शिधा' योजना आर्थिक चणचणीमुळे कागदावरच राहिली आहे. गणेशोत्सवापाठोपाठ दिवाळीलाही नागरिकांना हा शिधा मिळणार नाही. बहुधा ही योजना कायमचीच बंद केली जाण्याची चिन्हे आहेत. राज्यातील गोरगरिबांना सणासुदीचे दिवस आनंदाने साजरे करता यावेत, यासाठी सुरु करण्यात आलेल्या आनंदाची शिधा योजनेला लाडकी बहीण योजनेचा फटका बसल्याचं मत राज्याच्या मंत्रिमंडळातील एका महत्त्वाच्या नेत्याने व्यक्त केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

आर्थिक चणचणींमुळे निर्णय? तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने निवडणुकीनंतर सत्तेवर येण्यासाठी लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज, आनंदाचा शिधा योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थाटन योजना यासह अनेक लोकप्रिय योजनांची घोषणा केली होती. निवडणुकीनंतर सत्तेवर ▶▶ उर्वरित पान २ वर

# चक्रीवादळाच्या 'शक्ती'चा महाराष्ट्राला धोका? पुढील २४ तासांत हवामानात नेमके कोणते बदल अपेक्षित?




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये पावसाचं प्रमाण असमान पाहायला मिळत असून पुढच्या २४ तासांसाठी राज्याच्या कोणत्या भागांमध्ये पावसाच्या धर्तीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे याबाबतची संक्षिप्त माहिती हवामान विभागाच्या मुंबई शाखेकडून देण्यात आली आहे. ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगानं वाहणाऱ्या वाऱ्यांसह पुढील २४ तासांमध्ये मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये पावसाची हजेरी असेल असा इशारा देण्यात आला आहे. यादरम्यान मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. ज्यामुळं नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. कोकणापासून मराठवाड्यापर्यंत कसं असेल पर्जन्यमान? कोकण विभागात येणाऱ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात चार अर्ज प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये भुसंपादनाचे २ अर्ज, गोण खनीज १ अर्ज आणि १ जमावबंदी १ असे एकूण ०४ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे ▶ उर्वरित पान २ वर

# विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी केली बीड विमानतळ प्रकल्पाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराजवळील कामखेडा येथे प्रस्तावित विमानतळासाठी कामखेडा गावात जागा निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आज एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी बीड शहराजवळील कामखेडा येथील प्रस्तावित विमानतळ परिसरास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. या पाहणी दरम्यान प्रस्तावित जागेचे सर्व तांत्रिक व प्रशासकीय पैलू तपासण्यात आले. विमानतळ प्रकल्पासाठी बीडजवळील कामखेडा परिसर अधिक सोयीचा ठरेल, असा निष्कर्ष प्राथमिक चर्चेतून पुढे आला आहे. याठिकाणी राज्य सरकारची दोनशे एकरांपेक्षा अधिक जमीन उपलब्ध असून, जमिनीचा उतार आणि भौगोलिक परिस्थिती विमानतळ उभारणीस पोषक असल्याचे अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले. या संदर्भात प्रशासनासोबत बैठक घेऊन एकत्रितपणे समन्वयाने याला गती दिली जाईल असे स्पष्ट केले आहे. या प्रसंगी भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापक प्रशांत गुप्ता, महाव्यवस्थापक रोशन दासू कांबळे, उपमहाव्यवस्थापक अनुराग मिश्रा, पि.के. मोरया, सहाय्यक महाव्यवस्थापक अशवाणी कुमार आणि अंजनी कुमारी, महाराष्ट्र विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता राजकुमारी बॅरी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी रवींद्र चिंचाणे, जिल्हा अधीक्षक भूमिलेख ▶▶ उर्वरित पान २ वर



◆ पान १ वरून पुढे...

## कोणत्या ठिकाणी...

नागभिड, बीड (महिला), चिमूर (महिला), चांदवड, देऊळगांवराजा (महिला), कळमेश्वर, परतूर (महिला), मैंदर्गी (महिला), अंजनगांवसूर्जी, दिग्रस (महिला), आर्णी, सेलू, सावदा (महिला), गडहिंग्लज, जळगांव जामोद,

### अनुसुचित जमाती या प्रवर्गासाठी राखीवः– ११ नगरपालिका

पिंपळनेर (महिला), पिंपळगांव-बसवंत, भडगांव (महिला), यवतमाळ (महिला), वरुड, वणी (महिला), शेंदूरजनाघाट (महिला), राहुरी, एरंडोल, अमळनेर, उमरी (महिला),

### नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) : ६७ नगरपालिका

तिरोडा, वाशिम, धामणगांवरेल्वे (महिला), भोकरदन (महिला), भद्रावती, परांडा, भगूर (महिला), मालवण (महिला), नंदुरबार, खापा, वरोरा (महिला), हिंगोली (महिला), मोर्शी (महिला), शहादा, उमरेड (महिला), नवापूर, त्र्यंबक, कोपरगांव, हिवरखेड (महिला), बाळापूर (महिला), शिरुर (महिला), कुळगांव-बदलापूर (महिला), मंगरुळपीर, कन्हान-पिंपरी, पाथर्डी, देगलूर (महिला), नेर-नबाबपूर (महिला), धाराशिव (महिला) , इगतपूरी (महिला), रामटेक, माजलगांव (महिला), नशिराबाद, पालघर , मुल (महिला), वरणगांव , बल्लारपूर (महिला), मलकापूर, जि. बुलडाणा, इस्लामपूर, जुन्नर (महिला), कुडूवाडी (महिला) , मोहपा, तुमसर, औसा (महिला), महाड, मुरुड-जंजिरा (महिला), अकोट (महिला), राहता, श्रीवर्धन, विटा (महिला), ब्रम्हपूरी, दर्यापूर, चोपडा (महिला), वैजापूर, सटाणा (महिला), काटोल (महिला), गोंदिया, सांगोला, दौंड (महिला), रोहा (महिला), वर्धा, देसाईगंज (महिला), येवला, पुलगांव (महिला), कर्जत, जि. रायगड (महिला), दोंडाईचा-वरवाडे (महिला), कंधार, शिरपूर-वरवाडे

### खुला प्रवर्ग राखीव :१३६ नगरपालिका

परळी-वैजनाथ (महिला), मुखेड (महिला), अंबरनाथ (महिला), अचलपूर (महिला), मुदखेड (महिला), पवणी (महिला), कन्नड (महिला), मलकापूर, जि. कोल्हापूर (महिला), मोवाड (महिला), पंढरपूर (महिला), खामगांव (महिला), गंगाखेड (महिला), धरणगांव (महिला), बार्शी (महिला), अंबड (महिला), गेवराई (महिला), म्हसवड (महिला), गडचिरोली (महिला), भंडारा (महिला), उरण (महिला), बुलडाणा (महिला), पैठण (महिला), कारंजा (महिला), नांदुरा (महिला), सावनेर (महिला), मंगळवेढा (महिला), कळमनूरी (महिला), आर्वी (महिला), किनवट (महिला), कागल (महिला), संगमनेर (महिला), मुरगुड (महिला), साकोली (महिला), कुरुंदवाड (महिला), पुर्णा (महिला), कळंब (महिला), चांदुररेल्वे (महिला), चांदुरबाजार (महिला), भुम (महिला), रत्नागिरी (महिला), रहिमतपूर (महिला), खेड (महिला), करमाळा (महिला), वसमत (महिला), हिंगणघाट (महिला), रावेर (महिला), जामनेर (महिला), पलुस (महिला), यावल (महिला) , सावंतवाडी (महिला), जव्हार (महिला), तासगांव (महिला), राजापूर (महिला), सिंधीरेल्वे (महिला), जामखेड (महिला), चाकण (महिला), शेवगांव (महिला), लोणार (महिला), हदगांव (महिला), पन्हाळा (महिला), धर्माबाद (महिला), उमरखेड (महिला), मानवत (महिला), पाचोरा (महिला), पेण (महिला), फैजपूर (महिला), उदगीर (महिला), अलीबाग (महिला), फलटण, अहमदपूर, पाथरी, चाळीसगांव, तळोदा, वाई, नांदगांव, जयसिंगपूर, निलंगा, लोहा, खोपोली, राजगुरूनगर , कराड, जेजुरी, उमरगा, आळंदी, पुसद, बारामती, जत, पारोळा, तळेगांव-दाभाडे, सासवड, गडचांदुर, रिसोड, वेंगुर्ला, पातूर, किल्लेधारुर, चिखली, मेहकर, दारव्हा, सिल्लोड, सिन्नर, देवळी, मुरूम, वडगांव, महाबळेश्वर, आष्टा, दुधणी, कुंडलवाडी, खुलताबाद, नरखेड, राजूरा, सिंदखेडराजा, वाडी, डहाणू, देवळाली प्रवरा, कामठी, अक्कलकोट, सातारा, भोर, इंदापूर, चिपळून, माथेरान, श्रीगोंदा, श्रीरामपूर, मनमाड, नळदुर्ग, भोकर, बिलोली, अंबेजोगाई, जिंतूर, सोनपेठ, गंगापूर, पांढरकवडा, घाटंजी, मुर्तीजापूर, चिखलदरा, तुळजापूर

## बीडचे नगराध्यक्षपद ...

आरक्षण जाहीर करण्यात आले. जनतेतूनच नगराध्यक्ष निवडला जाणार असल्याने हे आरक्षण पाच वषारसाठी आहे. बीडचे नगराध्यक्षपद एससी महिलेसाठी आरक्षित झाले आहे. यामुळे बीडच्या भावी नगराध्यक्षांचे स्वप्न भंगले असून, येथे नगराध्यक्ष म्हणून अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून तयारी सुरू केली होती. पण आरक्षणाची बातमी आली आणि त्यांच्या आशेवरच पाणी फेरुन गेली असल्याचे दिसून येत आहे. तसेच अंबाजोगाई येथील नगराध्यक्षपद हे ओबीसी साठी आरक्षित झाले आहे. तर माजलगाव ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाल्याने येथेही अनेकांचा हिरमोड पाहायला मिळत आहे. परळीचे नगराध्यक्षपद हे ओपन महिलेसाठी आरक्षित असल्याने येथे कोण उमेदवार असणार याकडे लक्ष लागले असून, जिल्ह्यातील चित्र पाहाता मुंडे बहीण-भाऊ नगराध्यक्षपदासाठी कोणाला निवडणुकीत उतरविणार याकडे लक्ष लागले आहे. तर गेवराई आणि धारुर येथील नगराध्यक्षपद हे ओपन राहिलं असल्याने येथे नगराध्यक्षपदासाठी रस्सीखेच होणार असे चित्र आहे. एकंदरीत जिल्ह्यातील सहाही नगराध्यक्षांचे आरक्षण जाहीर झाल्याने यामुळे कंही खुशी कंही गम असे दिसत आहे. तर आता प्रभाग आरक्षणाकडे लक्ष लागले असून हे आरक्षण बुधवारी (दि.८) जाहीर होणार आहे. यानंतर खऱ्या अर्थाने इच्छूकांची धावपळ सुरू होईल.

## MPSC कडून १३८....

जागांसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे. महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुरुवात ७ ऑक्टोबरला दुपारी १ वाजता होईल. तर, अर्ज सादर करण्याचा अखेरचा दिनांक २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत असेल. ऑनलाईन शुल्क देखील २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत स्वीकारलं जाणार आहे. तर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत चलनाद्वारे शुल्क भरणार असल्यास ते २९ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत घेता येईल. त्यानंतर ३० ऑक्टोबरला कार्यालयीन वेळेत स्टेट बँकेच्या शाखेत चलन भरावं लागणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट क सेवा परीक्षेला अर्ज करणारा उमेदवार भारतीय असणं आवश्यक आहे. उद्योग निरीक्षक, गट-क संवर्ग वगळता इतर संवर्गासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता उमेदवाराकडे असणं आवश्यक आहे.

## शरद पवारांनी...

समाजाचं मोठं नुकसान झालं. पण ज्यांनी ओबीसींना आरक्षण दिलं, त्या पवारांचे उपकारही ओबीसी नेत्यांनी मानले नाहीत. यापूर्वी मराठा आरक्षण आंदोलनाला शरद पवारांचा छुपा पाठिंबा असल्याचा आरोप भाजप नेत्यांनी केला होता. मात्र, आता जरांगे यांनी थेट पवारांवर निशाणा साधत मराठा समाजाच्या नुकसानाचं खापर त्यांच्यावर फोडलं आहे. छगन भुजबळांवरही आरोपांचा भडिमार- दरम्यान, जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावरही गंभीर आरोप केले. भुजबळ आणि वडेट्टीवार यांच्यात गुप्त बैठक झाली असून, त्यात ओबीसी आंदोलनाचं नेतृत्व काँग्रेसकडे सोपवण्याचा प्रस्ताव ठेवला गेल्याचा दावा जरांगे यांनी केला. अजित पवारांनी मला इथं गुंतवून ठेवलंय, त्यामुळे ओबीसी आंदोलनाचं नेतृत्व काँग्रेसने घ्यावं, असं भुजबळांनी वडेट्टीवारांना सांगितलं, असा खळबळजनक दावा जरांगे यांनी केला. जरांगे मराठ्यांचे नेते नाहीत, भुजबळांचं प्रत्युत्तर-जरांगेंच्या या आरोपांना भुजबळांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. मनोज जरांगे हे मराठा समाजाचे नेते नाहीत. मराठा समाजाने त्यांना उगाच डोक्यावर चढवलंय, असं भुजबळ म्हणाले. तसेच, जरांगेंच्या दाव्याप्रमाणे कोणतीही गुप्त बैठक झाली नसल्याचं विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

## ३७ लाखांच्या...

या वाहनाद्वारे वाहतूक करण्याचा करार केला. ट्रक मालक नदीम खान मुजाहेद खान (रा. अपना कॉर्नर, परभणी) आणि चालक सय्यद अजगर सय्यद सज्जान (रा. दर्गारोड, परभणी) यांच्याकडे हळदीचा माल सुपूर्द करण्यात आला होता. परंतु, १ ऑक्टोबर रोजी नदीम खान याने फिर्यादी सोनी यांना फोन करून सांगितले की, अंबाजोगाईजवळ कळंब फाटा परिसरात अज्ञात चोरट्यांनी ट्रक लुटल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई पोलीस ठाण्याचे निरिक्षक मुरलीधर खोकले यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरिक्षक रंगनाथ जगताप यांनी पोलीस पथकासह तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि कसून तपास सुरु केला. तपासात ट्रकमध्ये केवळ ३० पोती हळद शिल्लक असल्याचे आणि उर्वरित ५७० पोती गायब असल्याचे आढळून आले. घटनास्थळावरील परिस्थिती आणि नदीम खान याने दिलेली माहिती यावरून प्रकरण संशयास्पद वाटल्याने सपोनि जगताप यांनी ट्रकचालक सय्यद अजगर याची चौकशी केली असता, त्याने कबुली दिली की कोणतीही लूट झाली नसून ट्रक मालक नदीम खान याच्यासोबत संगणमत करून हळदीचा संपूर्ण माल परभणी येथे उतरवून विल्हेवाट लावला. त्यानंतर पोलिसांना दिशाभूल करण्यासाठी ट्रक लुटल्याचा बनाव करण्यात आला. या खुलाशानंतर पोलिस निरीक्षक खोकले यांनी डीबी पथकातील पीएसआय असद आणि अंमलदारांना तात्काळ परभणीला रवाना केले. या तपासादरम्यान ५७० पोती म्हणजेच २८.५० टन हळद हस्तगत करण्यात आली. या मालाची एकूण किंमत ३७ लाख ८१ हजार ७०० रुपये आहे. पोलिसांनी चालक सय्यद अजगर यास अटक करून तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळवली आहे. त्यानंतर ट्रक मालक नदीम खान यालाही अटक करून चौकशी सुरू आहे. प्रकरणाचा तपास सपोनि जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून, अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे व्यापारी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

## पुण्यातील २२०००....

हाती घेतली आहे. संबंधित कंपनीच्या सिरपचा साठा आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे आदेश निरीक्षकांना देण्यात आले असल्याची माहिती पुणे विभागाचे सहआयुक्त गिरीश हुकरे यांनी दिली आहे. केंद्र सरकारचं म्हणणं काय? दरम्यान, या घटनेनंतर केंद्र सरकारनेही सर्व राज्यांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. केंद्रीय आरोग्य सेवा महासंचालनालयाने (डीजीएचएस) दोन वर्षांखालील मुलांना कफ सिरप देऊ नये, असे स्पष्ट केले आहे. या वयोगटातील मुलांच्या शरीरात औषधांतील रासायनिक घटकांचे विघटन व्यवस्थित होत नाही, त्यामुळे त्याचे विषारी दुष्परिणाम होऊ शकतात. पाच वर्षापर्यंतच्या मुलांसाठीही ही औषधे पूर्णपणे सुरक्षित नसल्याचे डीजीएचएसने म्हटले आहे. कोल्ड्रीफ आणि नेक्सा डीएस या दोन खोकल्याच्या औषधांवर आता बंदी घालण्यात आली आहे. ज्या कोल्ड्रीफ नावाच्या औषधाने सर्वाधिक बळी घेतले, ते औषध तामीळनाडूमधील श्रीसन फार्मास्युटीकल नावाची कंपनी बनवते. देशभरातील अनेक राज्यांना या औषधाचा पुरवठा होतो. या औषधात डायथिलीन ग्लायकॉल या वाहन उद्योगांत वापरल्या जाणाऱ्या घातक व विषारी रसायनाची भरमसाट भेसळ करण्यात आली होती. या रसायनाचे प्रमाण औषधात केवळ ०.१ टक्का इतकेच अपेक्षित असताना तब्बल ४६ ते ४८ टक्के इतके प्रमाण या औषधाच्या तपासणीत आढळून आले. औषधाचा दर्जा राखण्याऐवजी कारच्या कुलंट व ब्रेकमध्ये वापरली जाणारी स्वस्तातील घातक रसायने या औषधात मोठ्या प्रमाणात मिसळण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे.

## बीडच्या जेलमध्ये....

कीर्तन पूर्णपणे बंद करून टाकलेल आहे. तसेच तिकडे त्या अधिकाऱ्याला भेटायला एक पादरी भेटायला येतो. कैद्यांना तुम्ही धर्मांतर करा तुम्हाला लाखो रुपये देतो अशा प्रकारची भूमिका तुरुंग अधिकारी घेत आहेत. बीडमध्ये सुरू असलेल्या या सर्व प्रकाराची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली असून त्याची चौकशी करावी आणि तुरुंग अधिकाऱ्याला बडतर्फ करावं अशी मागणी केली आहे. तुरुंग अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा आणि सीसीटीव्हीच्या आधारे तपास करावा अशी मागणी केल्याची माहिती आमदार गोपीचंद पडळकरांनी दिली. सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेची जी चौकशी सुरू आहे ती चौकशी निवृत्त न्यायाधीश किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याच्या माध्यमातून सुरू करावी. या मागणीसाठी भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी आपल्याला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचं पडळकर म्हणाले. गोपीचंद पडळकर म्हणाले की, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेत मागच्या वेळेस नोकर भरती घोटाळा झाला होता. त्या घोटाळ्याची चौकशी करावी आणि नव्याने नोकर भरती व्हावी अशी मागणी केलेली आहे. शेतकरी सहकारी सूतगिरणी यात देखील आर्थिक घोटाळा झालेला आहे. त्याबद्दल गुन्हा दाखल करावा अशी तिसरी मागणी केलेली आहे. सांगली जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात पाऊस पडलेला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान झालं आहे, सरसकट सगळ्या शेतकऱ्यांना मदत मिळावी अशी देखील मागणी केल्याचं आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले. मराठवाड्यातील पूरग्रस्तांना कारखानदारांनी मदत करावी अशी भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. त्यावर बोलताना गोपीचंद पडळकर म्हणाले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी भूमिका योग्य घेतलेली आहे की कारखानदारांना १०,००० कोटींची मदत केलेली आहे. मग जर असा प्रसंग शेतकऱ्यांवरती येत असेल तर कारखानदारांनी का उभा राहू नये? तुम्ही सरकारकडून मदतीची अपेक्षा करता आणि मग अशा बाबतीमध्ये तुम्ही परत माघार घेण्याची गरज नाही ना. तुम्ही पुढे यायला पाहिजे होतं.

## 'लाडक्या बहिणी'....

येताच आर्थिक चणचणींमुळे अनेक लोकप्रिय योजनांना कात्री लागण्यास सुरुवात झाली. यंदा दिवाळीत सर्वसामान्यांना आनंदाचा शिधा देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या निर्णयामागे लाडकी बहीणचं काही कनेक्शन आहे का? अशी चर्चा सुरु झालेली असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री छगन भुजबळांनीही आपल्याला असेच वाटत असल्याचं म्हटलं आहे. लाडकी बहीणचा फटका- पत्रकारांशी बोलताना, गणपती व दिवाळीला आनंदाचा शिधा मिळावा म्हणून प्रस्ताव पाठवला होता. परंतु वित्त विभागाने शक्य नसल्याचे सांगितले. एका आनंदाचा शिधासाठी ३५० कोटींचा खर्च होतो. मला तर तसं वाटते की हा लाडकी बहीणचा फटका आहे. ४० ते ४५ हजार कोटी रुपये लाडक्या बहिणींसाठी लागतात. त्यामुळे त्याचा फटका बसला असू शकतो, असं स्पष्ट मत छगन भुजबळांनी व्यक्त केलं. अजित पवारही बोलले पैशांचे सोंग घेता येत नाही- शिवभोजन थाळी योजनेच्या निधीसाठीही आम्हाला प्रयत्न करावे लागतात. वर्षाला १४० कोटी लागतात. आता ७० कोटी रूपये मंजूर झालेत. मंत्रिमंडळात निर्णय घ्यावा लागेल, काय करायचं? असा सवाल भुजबळांनी केला आहे. तसेच पुढे बोलताना, सर्वच विभागांना निधीची कमतरता निर्माण झाली आहे. कॅबिनेटमध्येही चर्चा झाली यावर. दादाही (अजित पवारही) बोलले की पैशांचे सोंग घेता येत नाही. सर्व मंत्र्यांच्या गाड्या विकल्या तरी पैसे निर्माण होतील का? असा सवालही भुजबळांनी केला. दिवाळी आनंदात जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती पण... यंदा गेल्या काही महिन्यांमध्ये राज्यातील बऱ्याच भागात अतिवृष्टीचा तडाखा बसल्याने ६० लाख हेक्टरवरील पिके वाया गेली आहेत. लाखो शेतकऱ्यांना मदत पोहोचलेली नाही. अशा परिस्थितीत त्यांना दिवाळीत तरी दिलासा देण्याबाबत आनंदाचा शिधा योजनेचा लाभ सरकारकडून देण्यात येईल, अशी अपेक्षा होती. मात्र दिवाळी दोन आठवड्यांवर आलेली असताना शासकीय पातळीवर याबाबत कोणतीही हालचाल सुरू झाली नसून इतक्या कमी कालावधीत आनंदाचा शिधावाटप करणे अवघड असल्याचे उच्चपदस्थांनी सांगितले.

## चक्रीवादळाच्या 'शक्ती'चा...

पालघर, ठाणे, मुंबई, रायगड या जिल्ह्यांमध्ये मध्यम स्वरुपातील पावसाच्या सरींची हजेरी असेल तर, मध्य महाराष्ट्रात जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार इथं वादळी वाऱ्यांसह पावसाची हजेरी असेल. पश्चिम महाराष्ट्राच्या सातारा, सांगली आणि सोलापुरातही पावसाच्या हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तिथं मराठवाड्यात पावसाची तीव्रता कमी होणार असली तरीही हलक्या तरी नाकारता येत नाहीत. तर, विदर्भात मात्र भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर या जिल्ह्यांना हवामान विभागानं पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. मात्र पावसाचा जोर फारसा नसेल. सध्या राज्यात कधी पाऊस तर कधी ऊन असं वातावरण राहील तर, पावसानं उघडीप दिल्यानं काही भागांमध्ये तापमानात वाढ अपेक्षित आहे.

मुंबईत कसे असतील पावसाचे तालरंग? मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाच्या हलक्या सरींची बरसात होईल. काही भागांमध्ये पाऊस उघडीप देऊन सूर्यकिरणांची हजेरी असेल तर काही भागांमध्ये मात्र क्षणात काळेकुट्ट ढग दाटून येत पावसाच्या सरी बरसण्यास सुरुवात होईल असा अंदाज आहे. कुठवर पोहोचलं शक्ती चक्रीवादळ? अखेरच्या निरीक्षणानुसार रविवारपर्यंत चक्रीवादळ पश्चिम-मध्य अरबी समुद्रात जाणार पुढे सरकून सोमवारी सकाळी पूर्व-ईशान्येस सरकत कमकुवत होत जाणार आहे. याचा थेट धोका महाराष्ट्राला नसला तरीही दरम्यानच्या काळात मासेमारांनी खोल समुद्रात जाऊ नये, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. या वादळाचा महाराष्ट्राला थेट धोका नसला तरीही पुढच्या २४ तासांमध्ये राज्याच्या किनारपट्टी भागांमध्ये पावसासाठी पोषक वातावरणनिर्मिती होताना दिसणार आहे ही बाब नाकारता येत नाही.

## जिल्हास्तरीय ...

विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण चार तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## विमानतळ प्राधिकरणाच्या...

कृष्णा शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी बीड अमोल सांगुळे आणि वन परिमंडळ अधिकारी बीड देविदास गाडेकर उपस्थित होते. या पाहणी दरम्यान एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाने विमानतळासाठी निवडलेल्या जागेची सविस्तर पाहणी केली. यानंतर या समितीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेवून विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक सुविधांची तपासणी करुन नियोजनावर सविस्तर चर्चा केली. विमानतळासाठी एकूण १७० हेक्टर जागा लागणार असुन, यापैकी ८० हेक्टर जागा शासनाकडे उपलब्ध असुन इतर जागेचे भूसंपादन करावे लागणार आहे. विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, जमीन मोजमाप, वन विभागाशी संबंधित सर्व परवानग्या, पाणी पुरवठा आणि रस्ते संपर्क यासह विविध तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती घेवून चर्चा केली. विमानतळ उभारणीसाठी जिल्हा प्रशासन आणि विमानतळ प्राधिकरण यांच्यात समन्वयाने नियोजन पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कामखेडा ठिकाण अधिक व्यवहार्य असून, कामखेडा हे ठिकाण सोलापूर-नाशिक राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर आहे. तसेच येथील रस्ते संपर्कही उत्तम आहे. याठिकाणाच्या भौगोलिक रचनेमुळे भूसंपादनाचा खर्च तुलनेने कमी येणार आहे. या पाहणीदरम्यान विमानतळ प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वयाने प्रकल्पाचे नियोजन जलद गतीने पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, विमानतळ प्रकल्पामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल, तसेच गुंतवणुकीच्या संधींनाही चालना मिळणार आहे. यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न सुरू केले आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## मुंबईत डॉ.योगेश...

पंचनामे, मदत व गाव पुनर्वसनाच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.क्षीरसागर यांनी केली. तसेच बीड शहरातील डीपी रस्ते प्रकल्पालाही अजितदादा पवार यांनी सकारात्मकता दर्शवली. तसेच, अन्य रस्त्यांसाठी डीपीसीव्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त निधी दिला जाणार आहे.

## ब्रम्हनाथ येळंब....

लवकरच या दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष कामांना सुरूवात होणार आहे. प्रकल्पांतर्गत बंधाऱ्यांचे मजबुतीकरण, गेट्सची दुरुस्ती, नवीन बॅरेज बांधकाम, जलसाठा क्षमता वाढविणे आणि जलप्रवाह नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे केली जाणार आहेत. परिणामी परिसरातील शेकडो हेक्टर शेतीला थेट सिंचनाचा लाभ मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.या निर्णयामुळे शिरूर (कासार) परिसरातील जलसंपदा व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा होईल. उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी होऊन पिकांचे उत्पादन वाढेल, भूजल पातळी स्थिर राहील, तसेच जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता सुधारेल.स्थानिक शेतकरी, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की,हा निर्णय आमच्या शेतशिवाराच्या पुनरुत्थानाचा आणि जलसमृद्धीचा पाया ठरणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, तसेच भाजपा-महायुती सरकार आणि आ. सुरेश धस यांचे शेतकरी व ग्रामस्थांकडून मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर शिरूर (कासार) तालुक्याच्या कृषी विकासाला नवी दिशा आणि बळकटी मिळेल, असा विश्वास स्थानिक जनतेने व्यक्त केला आहे.

## कपिलधारवाडीत जमीन....

ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे, या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (ऋड्ढख) केंद्रातील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे. या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी. या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. याच आशयाचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडनवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री अजितदादा पवार यांना देऊन या गंभीर बाबीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

## बीड तालुक्यातील तोंडाशी....

असे अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष गोपाळ चव्हाण साहेब, मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके युवक जिल्हाध्यक्ष भागवत मस्के बीड जिल्हा सरचिटणीस बंडू आप्पा कोलगडे जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब मराठे जिल्हा उपाध्यक्ष शाम गायकवाड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर कवचट जिल्हा संघटक राहुल शिंदे तालुका उपाध्यक्ष शिवाजी हिदुळे तालुका उपाध्यक्ष रवि जोगदंड बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके व पद अधिकारी यांनी केले आहे

## शिरूर कासार...

पथसंचलन करण्यात आले. त्यानंतर शस्त्रपूजन सोहळा संपन्न झाला. समारोपाचा कार्यक्रम कालिकादेवी संस्थान, शिरूर कासार येथे पार पडला. या कार्यक्रमास जिल्हा संघचालक संतोष सानप, प्रमुख पाहुणे रामेश्वर शास्त्री (ब्रम्हनाथ येळंब संस्थान), तसेच तालुका कार्यवाह व तालुका संघचालक यांची उपस्थिती लाभली.यावेळी प्रमुख वक्ते उत्तम कांदे म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ संघटना नसून संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन आहे. संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंत समाजाच्या सहकार्यामुळेच हा शताब्दी प्रवास यशस्वी झाला आहे. परंतु हे कार्य अखंड व अविरत चालणारे आहे. मातृभूमीला परम वैभवसंपन्न करण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले इतिहास साक्षी आहे, जेव्हा जेव्हा हिंदू समाजात आत्मग्लानी किंवा फूट पडली तेव्हा भारतावर परकीय आक्रमणे यशस्वी ठरली. म्हणूनच सामर्थ्यवान, बलसंपन्न आणि राष्ट्रहित सर्वोपरी मानणाऱ्या समाजाच्या आधारावरच भारत पुन्हा एकदा परम वैभवसंपन्न बनेल.भारत जगावर राज्य करण्यासाठी नव्हे, तर विश्वकल्याणासाठी विश्वगुरू बनत आहे. या ध्येयासाठी प्रत्येकाने 'पंच परिवर्तन' जीवनात आणले पाहिजे – 'स्व'चा बोध, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य पालन,पर्यावरणपूरक जीवनपद्धती आणि कुटुंब प्रबोधन.'या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने स्वयंसेवक, नागरिक व माता-भगिनींनी उपस्थित राहून शिस्तबद्ध व देशभक्तिपूर्ण वातावरणात उत्सवाचा आनंद लुटला.

## राष्ट्रीय खाद्यतेल...

कंपनी सदर बाबीच्या लाभास तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज करण्यास पात्र राहील. लाभार्थ्यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह अर्ज जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,कार्यालयास सादर करावा. ज्या कार्यक्षेत्रात सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (FPOS) आणि सहकारी संस्था आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनी चे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनी चे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनी चे कमीटीचे ठराव,सभासदांची यादी मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनी चे Balance Sheet/Audit Riport, ज्या जागेवर गोदाम उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक:- दि.०९ ऑक्टोबर २०२५ अखेर आपले अर्ज जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. अंमलबजावणी प्रक्रिया निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छाननी नंतर पुर्वसमती देण्यात येईल. पूर्व संमती भेटल्यानंतर गोदाम बांधकामास कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे. अनुदान रक्कम :- गोदाम बांधकामाची क्षमता २५० मे. टन असुन अनुदान जास्तीत जास्त रु १२.५० लाख किंवा गोदाम बांधकामास आलेल्या खर्चाच्या ५० टक्के जे कमी असेल ते देय आहे. गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषी माल साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. या बाबत रु.१०० च्या स्टंप पेपरवर नोटराईज्ड हमी पत्र देणे बंधनकारक राहील. तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत जिल्ह्यातील सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (FPOS) आणि सहकारी संस्था यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड येथे गोदाम बांधकामासाठी अर्ज सादर करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी एस.एम.साळवे यांनी केले आहे.

## पिंपळनेर मध्ये....

करून जीवे मारण्याची धमकी दिली यावरून सतीश पाटील यांनी पिंपळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पिंपळनेर पोलिसांनी तात्काळ पंचनामा करून आरोपी योगीराज नरवडे याला अटक केली आहे .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गेवराईत रंगला कृष्ण जन्माचा सोहळा

## शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेस उस्फूर्त प्रतिसाद







**गेवराई । प्रतिनिधी**

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त गेवराई शहरांमध्ये आयोजित केलेल्या भागवत कथेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून कथा प्रवक्ते समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधुर वाणीतून कथा सादर करून उपस्थितांची मने जिंकली आहेत. भागवत कथे बरोबरच सायंकाळच्या सत्रामध्ये संगीत भजन आणि रात्री कीर्तनालाही भाविक भक्त उत्स्फूर्त प्रतिसाद देत असून शिवाजीराव (दादा) पंडित अभिष्टचिंतन सोहळ्याचे पदाधिकारी कीर्तन महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. आज शिवनगरीत कृष्ण जन्माचा सोहळा रंगला. उपस्थित भाविक भक्तांनी यावेळी आनंद साजरा केला. गेवराई शहरातील र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर उभारलेल्या शिवनगरीत भागवत कथा सुरू असून भागवताचार्य सम ाधान महाराज शर्मा आपल्या मधूर वाणीतून भगवत कथा कथन करत आहेत. कथा श्रवण करण्यासाठी महिला व पुरुष भाविकभक्त प्रचंड गर्दी करत आहेत. सोहळा समितीचे पदाधिकारी पदाधिकारी अभिष्टचिंतन सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. किर्तन महोत्सवाला माजी मंत्री शिवाजीराव पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, आ. विजयसिंह पंडित यांची उपस्थिती लाभत आहे. रविवारी सायंकाळच्या सत्रात सुप्रसिद राष्ट्रीय गायक पंडीत रमाकांतजी गायकवाड यांचे शास्त्रीय उपशास्त्रीय अभंग गायन तर रात्री ह.भ.प.कीर्तनकेसरी सागर महाराज बोराटे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन झाले. यावेळी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीडितांची सेवा ही गांधीजी, विनोबांची शिकवण: कराळे सर

### ●सिंदफणा पट्ट्यात पोहचली कराळे सर यांची मदत



**बीड । प्रतिनिधी**

सिंदफणा पट्ट्यात महापुराने हाहाकार उडाला आहे. मोसंबी बागा व पिके भूईसपाट झाल्याने शेतकरी पिचला गेला आहे. या पीडित शेतकर्यांची मदत करणे, ही महात्मा गांधी व विनोबा भावे यांची शिकवण असल्याचे प्रतिपादन नितेश कराळे सर यांनी केले.

यावेळी राजेसाहेब काका पवळ, शामराव घुगे, पन्हाळे मामा, डॉ. गवळी, जगदिश जाधव, जालिंदर रसाळ, राहुल राजळकर, संतोष रडे, पांडुरंग रडे, सुमित गवळी, अर्जुन पवळ, दादासाहेब पवळ, राजाराम निर्मळ, परमेश्वर कोळेकर, संतोष कारंडे, रामेश्वर पवळ, कैलास रडे, किशोर रडे, अभिजित रडे, बबलू नेमाने, नाथ राजळकर, ओंकार गचांडे, पपू तांबारे, राम पवळ आदी उपस्थित होते. विदर्भातील वर्धा भूमी राष्ट्रपिता महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या वास्तव्याने पुनित झालेली भूमी आहे. गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग, तरटेवाडी, काळेवाडी, तांदुळवाडी, बंडाळवाडीसह सिंदफणा पट्ट्यात महापूर व अतिवृष्टीने मोसंबी, कापूस, सोयाबीन, ऊस आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हे नुकसान पाहून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते तथा राज्यातील प्रसिद्ध शिक्षक नितेश कराळे सर वर्धा येथून किराणा व शैक्षणिक साहित्य अशी मोठी मदत घेऊन सिरसमार्ग येथे आले. यावेळी त्यांनी बागा व पिकांची पाहणी केली. ज्यांच्या घरात महापुराचे पाणी शिरले आहे, वह्या पुस्तके वाहून गेली, धान्य भिजले अशा शेतकर्याना त्यांनी मदत वाटप केली. महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या विचाराने संस्कारित झालेल्या भूमीतून आपण आले असून पीडितांना मदत करणे आपले कर्तव्य असल्याचेही ते म्हणाले. महापूर व अतिवृष्टीने शेतकरी खचला आहे, या शेतकरयांना सरकारने तात्काळ मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी सिरसम ार्ग, तरटेवाडी, बंडाळवाडी, तांदळवाडी यासह परिसरातील शेतकर्यांना किराणा व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

### ●खा. सुप्रीया ताई यांनी साधला संवाद

**नितेश कराळे सर यांच्या मोबाईलवरुन खासदार सुप्रिया सुळे यांनी सिरसमार्ग येथील शेतकर्यांशी संवाद साधला. पंचनामे व्यवस्थित होत नाहीत, असे त्यांना शेतकर्यांनी सांगितले. शेतकर्यांनी खचून जाऊ नये असे म्हणत यावेळी त्यानी शेतकर्यांना धीर देत मदत करण्यासाठी प्रशासनाला भाग पाडू, असेही त्या म्हणाल्या.**

# पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्ट ने आयोजित केला कर्तुत्वाचे शिल्पकार, नाशिक भूषण पुरस्कार सोहळा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष मा. मीनल कुलकर्णी सचिव सर्वच क्षेत्रांमध्ये सर्वतोपरी उत्कृष्ट योगदान देणाऱ्या अनमोल रत्नांना निमंत्रित करून पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्ट ने आयोजित केला कर्तुत्वाचे शिल्पकार, नाशिक भूषण पुरस्कार सोहळा. पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष मा. मीनल कुलकर्णी सचिव प्रदीप कुलकर्णी, ऋचा कुलकर्णी सदस्य शरद पवार व सहकारी यांनी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, कलाक्षेत्र, व्यवसाय, उद्योग आणि प्रामाणिक राजकीय प्रतिनिधी असलेल्या गुणवंतांना पुरस्कार सोहळ्यामध्ये सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदर पुरस्कार सोहळ्यामध्ये अध्यक्षस्थानी मा श्री अनिलजी कवडे भाप्रसे आयुक्त महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण पुणे, आदरणीय पप्पाजी सु.द. पुराणिक संस्थापक जयशंकर प्रतिष्ठान, सौ. शुभांगी भारदे उपजिल्हाधिकारी पुनर्वसन शाखा नाशिक, संगीत दिग्दर्शक तसेच गायक आदि राम चंद्र आणि अभिनेते मकरंद पाध्ये इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कर्तृत्वाचे शिल्पकार, नाशिक भूषण पुरस्कार सोहळा दिमाखदार पद्धतीने शंकराचार्य कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे संपन्न झाला. श्री महेंद्र विजय शेवाळे, सौ मंजिरी रवींद्र अहिरे आणि डॉक्टर रणजीत जोशी यांना नाशिक भूषण... श्री स्वप्निल देवरे, सौ.सोनल पारिक आणि श्री गौरव बुवा यांना शिक्षक भूषण तसेच श्री प्रवीण तिदमे, श्री आदि रामचंद्र, श्रीमती कल्पना पांडे, डॉ शैलेंद्र गायकवाड, श्री सुधीर मेथेकर, श्री म करंद पाध्ये, श्री उमेश राऊत, प्रा श्री दिलीप ठाकूर, डॉ दिनेश सोनवणे, श्री रज्जत शर्मा, श्री सुहास टिपरे, कुनिका विजेंद्र पाठक, राहुल विवेक कुलकर्णी, श्री प्रसाद देशमुख, गीत पराग पटणी, वृषाली वानखेडे, श्री अमोल भाऊ भागवत, श्री सचिन गोपाळ जाधव, सौ सुनंदा साहेबराव पाटील, श्री सुनील निरगुडे, सौ स्मि ता शेखर कुलकर्णी, सौ तृप्ती ढवण, कीर्ती राजगुरू, लीना बाळासाहेब पांडे, डॉ सौ गिरीशा शिंदे, सौ पुजा रत्नपारखी, श्री कौस्तुभ भाकरे, सौ श्रद्धा शेळके कमानकर, सौ विजया येवलेकर, सौ नयना हाबू पुराणिक, श्री साईप्रसाद कुंभकर्ण, सौ नीलम मनोज साठे, सौ ज्योत्स्ना राजेश नाईक, सौ कल्पना ज्ञानेश्वर पवार, श्री नानासाहेब शामराव पवार, श्री कैलास सुपारे ,सौ निशिगंधा सुनील कापडणीस यांना कर्तृत्वाचे शिल्पकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. तरुण-तरुणींनी देखील या कर्तृत्वाचे शिल्पकारांपासून प्रेरणा घेऊन, आपापल्या आयुष्यामध्ये त्यांनी आपले कुटुंब, समाज व आपल्या देशासाठी भविष्यात उत्तमोत्तम योगदान द्यावे... अशी आशा बाळगून, सदर कार्यक्रमाचे आयोजक, कार्यक्रमातील मान्यवर आणि कार्यक्रमातील पुरस्कारार्थी यांच्या वतीने सामाजिक आवाहन केले गेले.

# राजिप वडगाव शाळेत 'क्वेस्ट'चा गोष्टरंग

## पुस्तक न वाचणारी मुलगी या नाट्याच्याच्या माध्यमातून वाचन प्रेरणा



**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत अल्काईल अमाईन्सच्या उडठ मधून क्वेस्ट चा कार्यक्रम सुरू असून. त्यामधून आज विद्यार्थ्यांना वाचन गोडी लागावी या उद्देशाने संतोष शेटे,महेश वाळुंज,नूतन खानविलकर,पुजा दळवी यांच्या गटाने गोष्टरंग हा कार्यक्रम सादर केला.यावेळी पुस्तक न वाचणारी मुलगी नाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा देऊन वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले.विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत त्यातील पत्र,वाचन घटक समजून घेतले.

या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री.सुभाष राठोड सर,पदवीधर विषय शिक्षिका मयुरी धायगुडे,क्वेस्ट स्वयंसेवक संकेत काठोळे व विद्यार्थी म ोठ्याप्रमाणात उपस्थित होते. असे कार्यक्रम शाळांमधून होणे म्हणजे वाचन आवड निर्माण करण्याची पर्वणीच आहे,यातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व,विषय याची गोडी लागते.क्वेस्टचे धन्यवाद त्यांनी हा कार्यक्रम आमच्या शाळेत घेतला- श्री.सुभाष राठोड, मुख्याध्यापक शाळा वडगाव

# शेतीच्या फेरफारासाठी २ वर्षे टाळाटाळ, भद्रावती तहसील कार्यालयात विष पिणाऱ्या शेतकऱ्याचा मृत्यू



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रशासनाच्यानिर्ढावलेपणाचा, मुजोरीपणाचा आणि चिरीमि रीसाठी गरीब शेतकऱ्यांची कामं थांबवणाऱ्या वृत्तीचा आणखी एक बळी गेला आहे. चंद्रपुरातील भद्रावती तहसील कार्यालयात (उहरपवीरींी इहरवीरींरीेंळ ढशहीेळश्रवरी जषषळलश) विष घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करणारे शेतकरी परमेश्वर मेश्राम यांची अखेर मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात परमेश्वर मेश्राम यांचा मृत्यू झाला. जमिनीचा फेरफार नोंद करण्यास तहसील कार्यालयातून सातत्याने टाळाटाळ होत असल्याने मेश्राम यांनी २६ सप्टेंबरला तहसील कार्यालयात विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. भद्रावती तहसील कार्यालयातील प्रशासनाच्या नालायकपणाला कंटाळलेल्या परम ेश्वर मेश्राम यांनी कार्यालयातच विष प्राशन केलं. त्यानंतर अत्यवस्थ असलेल्या मेश्राम यांना चंद्रपूर जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात भरती करण्यात आले. मात्र अखेर १० दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला. परमेश्वर मेश्राम यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. जमिनीचा फेरफार जोपर्यंत आमच्या नावावर होत नाही आणि शेतीचा ताबा मिळत नाही तोपर्यंत मृतदेह घेणार नसल्याची कुटुंबीयांची भूमिका आहे. भद्रावती तालुक्यातील कुरोडा येथे परमेश्वर मेश्राम यांची वडिलोपार्जित ८.५ एकर जमीन आहे. या जमिनी बाबत कोर्टात केस सुरू होती. मात्र या केसचा निकाल मेश्राम यांच्या बाजूने लागून देखील गेल्या दोन वर्षांपासून तहसील कार्यालयातून त्यांच्या नावे फ ेरफार करण्यास टाळाटाळ केली जात होती. त्यामुळे त्रस्त झालेल्या मेश्राम यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले होते. या प्रकरणी भद्रावतीचे तहसीलदार राजेश भांडारकर आणि नायब तहसीलदार सुधीर खांडरे यांच्यावर निलंबनाची देखील कारवाई करण्यात आली आहे. मात्र मेश्राम यांच्या मृत्यूमुळे आता हे प्रकरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

### मुसळधार पावसाने भूजल पातळी वाढली

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पिंपळनेरसह परिसरात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार व सातत्यपूर्ण पावसामुळे भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. विहिरी तुडुंब भरल्याने रब्बी हंगामाची चिंता कमी झाली असून शेतकऱ्यांमध्ये विविध पिके घेण्यासाठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या पावसामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाली आहे. शेतीसाठी आवश्यक असलेले पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पाणी साठवणुकीच्या दृष्टीने हा पाऊस लाभदायक ठरला असून हवामान अनुकूल राहिल्यास पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. 'पावसामुळे विहिरी भरल्या आहेत, त्यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई जाणवणार नाही. शेतीसाठी पाण्याची समस्या आता कमी होईल, असे पिंपळनेर येथील शेतकरी मच्छिंद्र साठे यांनी सांगितले.'

# देवगाव येथील माजी शिक्षकांना निरोप व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खाऊ वाटप



**वडवणी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महत्वाची भूमिका ग्रामीण शिक्षणामध्ये बजावत असते येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सेवा सुख-सुविधा आणि शिक्षण चांगल्या प्रकारे मिळावे यासाठी सर्वजण अतोनात प्रयत्न नेहमीच करत असतात विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका ते शिक्षक बजावत असतात तेच त्यांचे पहिले गुरु असतात असे म्हणायला हरकत नाही तसेच आपण ज्या शाळेमध्ये शिकलो ज्या गावात आपण लहानचे मोठे झालो त्या परि आपलेही काही कर्तव्य आहेत त्या कर्तव्याशी पाठ न फिरवता. आपणही त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायची संधी भेटते तेव्हा तेव्हा नक्कीच ती संधी घ्या आणि त्या समाजाप्रती आपली कर्तव्य पार पाडा. आणि समाजात काहीतरी नवीन पेरण्याचा प्रयत्न करा सध्या शिक्षकांच्या बदलीमुळे अनेक शाळांमध्ये हृदय पिळवटून टाकणारे क्षण घडत आहेत. लाडक्या गुरूजींच्या प्रेमापोटी निरागस चिमुकले अश्रूंनी रडताना दिसत आहेत. शिक्षण देणारा देव माणूस जेव्हा शाळा सोडून जातो, तेव्हा मुलांच्या हृदयात पोकळी निर्माण होते. हाच तर खरी शिक्षक विद्यार्थी नातीची गोडी आणि पवित्रता आहे.हे चित्र फक्तं आणि फक्तं जिल्हा परिषद शाळांत दिसून येते दि. ०४/१०/२०२५ वार :शनिवार रोजी शाळेतील शिक्षक यांचा निरोप समारंभ साजरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी गावातील जेष्ठ नागरिक गावचे सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य शिक्षण प्रेमी. पत्रकार बाधवं व गावातील नागरिक महिला मंडळी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील आदर्श शिक्षक श्री. लांडगे सर. हाडुळे सर. पवार सर. गाढवे मॅडम पवार मॅडम ह्यांनी जिल्हा परिषद शाळे मध्ये चांगली सेवा दिली आहे. त्याच प्रम ाणे नवीन आलेले शिक्षक .कटारे सर बादाडे सर कोटुळे सर पटाईत सर यांचे गावच्या व शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रम चे सुत्र संचालन गवळी सर यांनी केले तर आभार बादाडे सर यांनी केले आहे निरोपावेळी सर्व शिक्षक बांधवांना अश्रू अनावर झाले यातून त्यांची गाव ,शाळा व विद्यार्थ्यांप्रती प्रेम दिसून आली.असे शिक्षक बदलून ज्या गावी गेले त्या शाळेचं भाग्य म्हणावे लागेल.

### हरवले आहेत



**नाव-गौतम जाधव वय ५0 वर्ष दिनांक ०५/१०/२०२५ टाइम:११ गोविंद नगर आशा टॉकीज चौक येथून निघून गेले आहेत कुठे दिसल्या संपर्क करा. मोबाइल नंबर- ९१७२५७२३६९/९६८९४५४११५**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. ०७ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

# मुंबईत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली पालकमंत्री अजितदादा पवार यांची भेट

## कपिलधारवाडी, हिंगणी खुर्दचे पुनर्वसन, नाट्यगृह, डीपी रस्त्यांना निधी मिळणार



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची सोमवारी (दि.६) भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. यावेळी बीड व शिरूर कासार तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागांचे पुनर्वसन, विकास प्रकल्प आणि आगामी स्थानिक निवडणुका या विषयांवर सखोल चर्चा झाली. बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील भूस्खलनाच्या गंभीर परिस्थितीबाबत डॉ.

### ● नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ठोक तरतूद हेडमधून मिळणार साडेआठ कोटींचा निधी

**बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी नगरविकास विभागाच्या ठोस तरतूद हेडमधून नाट्यगृह उभारण्यासाठी लवकरच साडेआठ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक निर्णय अजितदादांनी घेतल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.**

क्षीरसागर यांनी अजितदादांचे लक्ष वेधले. त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनासाठी तसेच त्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. यासंदर्भात पालकमंत्री अजितदादांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. हिंगणी खुर्द गावात पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबतही चर्चा झाली. या भागातील ▶ उर्वरित पान २ वर

### ● स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत झाली चर्चा

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत डॉ.योगेश क्षीरसागर व अजितदादा पवार यांच्यात सविस्तर चर्चा झाली. यावेळी अजितदादांनी मार्गदर्शन केले असून पूर्ण ताकदीने निवडणुका लढविल्या जाणार आहेत.**

## थोडक्यात...

### डाक विभागात 'ढाई आखर' पत्र लेखन स्पर्धेसाठी सहभागी होण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

भारतीय डाक विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावर पत्र लेखन स्पर्धा ढाई आखर बीड डाक विभागात आयोजित केली आहे. हि स्पर्धा दर वर्षी आयोजित केली जाते, तसेच गेल्या वर्षी बीड विभागातून दादासाहेब सादोलकर यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पुरस्कार मिळविला होता. तर या वर्षी २०२५ मध्ये पत्राचा विषय लेटर टू माय रोल मॉडेल असा असून स्पर्धकाने या विषयावर लिहावयाचे आहे. पत्र कोणत्याही भाषेमधून लिहिता येते. ही पत्र लेखन स्पर्धा वय वर्षे १८ पर्यंत एक गट व वय वर्षे १८ च्या वर दुसरा गट अशा दोन गटात विभागलेली आहे. स्पर्धकानी दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी माझे वय १८ पेक्षा कमी/जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख करावा.तसेच आपले नाव पत्ता व वयाचा उल्लेख असावा. पत्र मुख्य पोस्टमास्तर जनरल,महाराष्ट्र सर्कल,मुंबई जी पी ओ, मुंबई-४००००१ यांच्या नावाने लिहून डाकघरामार्फत लावलेल्या विशेष टपाल पेटीत टाकावयाचे आहे. पाकिटातून पत्र पाठवण्याची शब्द मर्यादा १००० व अंतर्देशीय पत्रासाठी ५०० शब्दाची आहे. पत्र पाठविण्याची शेवटची तारीख ०८ डिसेंबर २०२५ असून यानंतर पाठवलेल्या पत्राचा पत्र लेखन स्पर्धेमध्ये समावेश करण्यात येणार नाही. राज्य स्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रासाठी अनुक्रमे रु.२५०००/-,रु.१००००/- व रु.५०००/- राज्यस्तरावर निवडलेल्या प्रत्येक गटातून निवडलेल्या तीन उत्कृष्ट पत्राला राष्ट्रीय स्तरावर पाठवण्यात येईल व राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रासाठी अनुक्रमे रु.५००००/-, रु.२५०००/-, रु. १००००/- चे पारितोषक देण्यात येईल. तरी जास्तीत जास्त संख्येने जनतेने आपला सहभाग नोंद्वावा असे आवाहन डाक विभागाचे डाक अधिक्षक डी आर शिवणीकर यांनी केले आहे. आधिक माहितीसाठी डाक कार्यालयाचा दुरध्वनी क्र.०२४४२-२२७०३५ यावर संपर्क साधावा.

### शिवणीत आज आश्विन पौर्णिमेनिमित्त धम्मउत्सव ; भिक्खु धम्मशील थेरोंचे उपस्थित राहण्याचे आवाहन



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.आनंद कौसल्यायन नगर येथे, आश्विन पौर्णिमा व वर्षावास समापन निमित्ताने मंगळवार (ता.७) रोजी दुपारी १२ वाजता धम्मदेसना व भोजनदान तसेच सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. बौद्ध उपासक-उपासिका यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे. बीड शहरात बौद्ध धम्म प्रचाराच्या निमित्ताने विहारात वर्षाकाळात वर्षावास करुन, धम्मप्रचाराचे काम जलदगतीने होत आहे. त्यांच्या १३ व्या वर्षावास समारोपाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता ऐतिहासिक बोधी वृक्षाची पूजा, भोजनदान, दुपारी १२ वाजता बुद्ध वंदना, त्यानंतर धम्मदेसना, सत्कार व मार्गदर्शन होणार आहे. यावेळी भन्ते बुद्धबोधी यांची धम्मदेसना होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून फुले आंबेडकरी चळवळीतील कृतीशील कार्यकर्ते अनिल डोंगरे, प्रा.डॉ.विक्रम धन्वे उपस्थित राहणार आहेत. तसेच संपादक नितीन मूजमुले यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा केल्याबद्दल त्यांचा विशेषतः सत्कार समारंभ होणार आहे. दरम्यान बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्याकडून भोजनदान दिले जाणार आहे. तसेच अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्म परिषद यशस्वी करणाऱ्या उपासक-उपासिका यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात बौद्ध उपासक-उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.

### आष्टी येथील बी. फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय अविष्कार २०२५ मध्ये निवड



आष्टी । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना प्रयोगशीलता आणि संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी राजभवनाच्या वतीने राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन केले जाते, दरवर्षी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये केले जाते.त्याआधी विद्यापीठ स्तरावर स्पर्धा घेतल्या जातात, नुकतेच ३ व ४ऑक्टोबर रोजी विद्यापीठ स्तरावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी अविष्कार स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च,आष्टी ( डी फार्मसी, बी फार्मसी , एम फार्मसी कॉलेज) येथील विद्यार्थीनी आश्लेषा बाळासाहेब दहिफळे यांनी तिसरा क्रमांक मिळवला. या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेमध्ये निवड झालेली आहे, राज्यस्तरीय अविष्कार २०२५ ही स्पर्धा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ , नाशिक या ठिकाणी दिवाळीनंतर होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित असलेले मान्यवर उद्योजक डॉ. विवेक देशपांडे, विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ.वाल्मीक सरवदे कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभूरे, डॉ.गजानन सानप या सर्वांनी आश्लेषा बाळासाहेब दहिफळे या विद्यार्थिनीला प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह दिले.




# ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा बंधाऱ्यांचे रुपांतरण कामास प्रशासकीय मान्यता

## आ. सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नांना यश ; शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी ; सिंचन व्यवस्थेत नवा टप्पा

शिरूर (कासार) । प्रतिनिधी

शिरूर (कासार) तालुक्यातील जलसंपदा विकासासाठीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेले ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा को. प. बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतरण काम अखेर आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण व भगीरथ प्रयत्नांना यश येत महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या मान्यतेनंतर तालुक्यातील जलसंपदा विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले असून, शेतकऱ्यांसाठी ही जलसिंचनातील नवसंजीवनीठरणार आहे. ब्रम्हनाथ येळंब बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी ₹१७,३०,१२,६०६/- (सतरा



कोटी तीस लाख बारा हजार सहाशे सहा रुपये) इतका निधी मंजूर झाला आहे, तर निमगाव मायंबा बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी ₹२२,०८,९५,१५६/- (बावीस कोटी आठ लाख पंच्याण्णव हजार एकशे छप्पन्न रुपये) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.या निर्णयानंतर ▶ उर्वरित पान २ वर

# कपिलधारवाडीत जमीन खचली; तातडीने सर्वेक्षण करा

### ● खा.बजरंग सोनवणे यांचे भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाला पत्र



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली ग्राम पंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनीतील भेगा व जमीन खचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ▶ उर्वरित पान २ वर

# बीड तालुक्यातील तोंडाशी आलेला घास पावसाने नायनाट झाला, हेक्टरी एक लाख भरपाई द्यावी,, मराठा महासंघ

बीड । प्रतिनिधी

पावसामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी पुर्णपणे वाहुन गेलेल्या आहेत शेतकऱ्यांचा तोंडाशी आलेला घास पावसामुळे सर्व नायनाट झालेला आहे हेक्टरी एक लाख नुकसान भरपाई द्यावी तात्काळ ओला दुष्काळ जाहिर करावा सरसकट कर्ज माफी करावी करा अशी अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी आहे पण त्यांच्याकडे शासनाने



दुर्लक्ष केलेल आहे व अखिल भारतीय मराठा महासंघ रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही ▶ उर्वरित पान २ वर



*श्री खंडेश्वरी देवी संस्थान बीड कोजागिरी पौर्णिमा महापुजा ॲड.प्रशांत सुधाकरराव जोशी राजापूरकर व ॲड.आनंद दिलीपराव कुलकर्णी यांच्या हस्ते झाली.*

# शिरूर कासार येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव संपन्न



पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव आज शिरूर कासार येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून जालना विभाग संघचालक उत्तम कांदे उपस्थित होते. या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्ष पूर्ण होत असल्याने उत्सवात स्वयंसेवकांमध्ये विशेष आनंद व प्रेरणा दिसून आली. उत्सवाच्या प्रारंभी शिरूर कासार शहरातून सघोष ▶ उर्वरित पान २ वर

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सन २०२५-२६ अंतर्गत गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्याचे अवाहन राष्ट्रीय खाद्य तेल अभियान तेलबिया योजने अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी २५० मे.टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर बाबीचा लाभ घेण्यासाठी पात्रता : - जिल्ह्यातील सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (FPOS) आणि सहकारी संस्था.अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदार संस्थेने केंद्र शासनाच्या SMART प्रकल्प / वखार महामंडळ यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार अर्जदारांनी प्रथम बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर बँकने कर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार ▶ उर्वरित पान २ वर

# पिंपळनेर मध्ये तलवारीचा धाक दाखवून 3 लाख ९० हजाराची धाडसी चोरी

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथे गावचे सरपंच मनोज पाटील यांच्या घरी रविवारी रात्री साडेआठच्या दरम्यान गावातील युवकांनी तलवारच्या धाक दाखवून घरातील सामानाची तोडफोड करून नगदी व सोन्याचे दागिने असा तीन लाख ९० हजार लुटले असुन घरातील सामानाची नासधुस केली .तात्काळ पिंपळनेर पोलिसांनी पंचनामा करून आरोपीला अटक केली .

पिंपळनेर येथील गावचे सरपंच मनोज पाटील यांच्या घरी त्यांचे वडील सतीश पाटील एकटेच घरी असल्याची संधी साधून रविवार दि.५ ऑक्टोबर रोजी ८.४५,वाजण्याच्या



सुमारास पिंपळनेर येथील युवक योगीराज विनोद नरवडे वय ३५ याने अचानकपणे घरावर दगडफेक करून हातात लोखंडी पाईप व तलवार घेऊन सतीश पाटील यांच्या अंगावर धावून आला त्यामुळे ते घाबरून बाहेर पळून गेले. सदरील युवकाने घरात घुसून



कपाटातील नगदी ९०,हजार रुपये व दहा तोळ्याचे गंठण किंमत तीन लाख रुपये,असे एकुण ३ लाख ९० हजाराची धाडसी चोरी केली .घराजवळ असलेली मोटरसायकल व मिक्सर मशीनवर दगडफेक केली. घरातील लोकांना शिवीगाळ ▶ उर्वरित पान २ वर



*बीड: धांडे नगर रेणू हॉस्पिटल मधील डॉ. मुंडे हे दर रोज बोरवेल मधील पाणी उपसा करून रस्त्यावर सोडत असल्याने अनेक महिला विद्यार्थी, नागरिक यांच्या गाड्या स्लिप होऊन पडत आहेत. व पायी ये - जा करणाऱ्या नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. व रुग्णच्या गाड्या ह्या रस्त्यावर लावाल्या जात आहेत. या बद्दलचे निवेदन स्थानिक नागरिक जिल्हाधिकारी यांना देणार आहेत.*